


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक २०५ * नांदेड * शुक्रवार, दि. १ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# गाजणारे संसदेचे अधिवेशन

संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलै रोजी सुरू झाले आणि पहिल्याच आठवड्यात संसदेत संसदीय कामकाजापेक्षा राजकीय घडामोडींनीच सर्वाधिक लक्ष वेधून घेतले. विरोधकांनी पहिल्या दिवसापासूनच आक्रमक भूमिका घेतल्यामुळे अधिवेशनाचा सूरच बदलून गेला. 'ऑपरेशन सिंदूर' आणि मतदार यादीतील विशेष तपासणी (एसआयआर) हे दोन मुद्दे केंद्रस्थानी होते. सरकारने सुरुवातीला एसआयआरवर चर्चा टाळली, परंतु विरोधकांच्या दबावामुळे 'ऑपरेशन सिंदूर'वर दोन्ही सभागृहांत तब्बल १६-१६ तासांची चर्चा झाली. हे विरोधकांचे पहिले यश ठरले. संसदेच्या दोन्ही सभागृहांत घोषणाबाजी, गोंधळ, आणि वारंवार स्थगिती यामुळे संसदीय कामकाजामध्ये मोठा अडथळा निर्माण झाला. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले की, अशा गदारोळामुळे विरोधकच जास्त नुकसानात असतात, कारण ते सरकारला जबाबदार धरू शकत नाहीत. हे तत्त्वतः योग्य असले तरी यावेळी वास्तव उलटे घडले. विरोधकांनी सरकारला गारद करीत रणनीतिक विजय मिळवला. या आठवड्यातील सर्वात नाट्यमय घटना म्हणजे राज्यसभेत काँग्रेससह विरोधी पक्षांनी दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधात महाभियोग प्रस्ताव सादर केला. ६३ खासदारांनी यावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. त्याचवेळी लोकसभेत सरकारनेही एक महाभियोग प्रस्ताव मांडला, ज्यावर १५२ खासदारांच्या सह्या होत्या. मात्र राज्यसभेतील प्रस्तावात सत्ताधाऱ्यांचा सहभाग नसल्याने सत्ताधारी पक्ष अडचणीत आला. उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांनी हा प्रस्ताव स्वीकारताच राजकीय खळबळ उडाली. अवघ्या काही तासांतच त्यांनी आरोग्याच्या कारणावरून राजीनामा दिला. सरकारने याला वैयक्तिक कारणे सांगितली असली, तरी विरोधकांनी त्यात 'संविधानविरोधी हस्त-क्षेप' असल्याचा आरोप करत सरकारच्या वृत्तीवर प्रहार केला. या सगळ्या घटनांमध्ये एक बाब ठळकपणे समोर आली ती म्हणजे विरोधकांची अभूतपूर्व एकजूट. जेव्हा आपलं अस्तित्त्व नष्ट होण्याची वेळ येते तेव्हा अशी एकजूट दिसून येते. आम आदमी पक्ष 'इंडिया' आघाडीतून बाहेर पडला असला तरी संसदेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, द्रमुक, सीपीआय, सीपीएम व इतर अपक्षांनी सरकारविरोधात सामूहिक भूमिका घेतली. या रणनीतीमुळे त्यांनी केवळ सरकारवर दबाव निर्माण केला नाही, तर माध्यमे आणि जनतेचे लक्षही वेधून घेतले. सरकारच्या बाजूने यावेळी फारसा बचाव होताना दिसला नाही. 'सभागृह न चालल्याने विरोधकच दुर्बल होतात' हा सरकारचा जुनाच डाव यावेळी फसला. एसआयआरसारख्या संवेदनशील विषयावर सरकारने चर्चा टाळल्याने पारदर्शकतेचा अभाव स्पष्ट झाला. विरोधकांनी संसदेतील गोंधळातही 'नरेटिव्ह' आपल्या बाजूने खेचण्यात यश मिळवले. उपराष्ट्रपतींचा राजीनामा, महाभियोग प्रस्तावाची कबुली आणि 'ऑपरेशन सिंदूर'वरील विस्तृत चर्चा या साऱ्यांनी सरकारची रणनीती कोलमडली. अधिवेशनाचा पहिला आठवडा सरकारसाठी फक्त राजकीय संकट नाही, तर धोरणात्मक आव्हानही ठरला आहे. सत्ताधारी पक्षाच्या अंतर्गत गोंधळाने या परिस्थितीत भर घातली आहे. आता जर पुढील आठवड्यांतही सरकारने विरोधकांचे प्रश्न टाळण्याचा प्रयत्न केला, तर संसदेतील संघर्ष अधिक तीव्र होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर, देशात निवडणूकपूर्व वातावरण तयार होत असताना अशा राजकीय उलथापालथी महत्त्वाच्या ठरतात. भाजपला यावेळी पूर्ण बहुमत नसल्याने नितीश कुमार आणि चंद्राबाबू नायडू यांच्यासारख्या घटक पक्षांचा आधार घ्यावा लागत आहे. यामुळे सत्तेत असतानाही सरकारला काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर माघार घ्यावी लागत आहे. संसद हे केवळ कायदे करण्याचे ठिकाण नसून, सरकारला जबाबदार धरून लोकशाही बळकट करण्याचे केंद्रही आहे. या अधिवेशनाने हे दाखवून दिले की, मजबूत आणि एकवटलेले विरोधक सरकारला नजरेला नजर देऊ शकतात. याचा अर्थ सत्ताधारी किंवा विरोधक या दोघांचे सगळेच म्हणणं खरं आहे असं नाही. ते सत्याच्या कसोटीवर तपासून घेतलं पाहिजे कारण संसद असो की विधानसभा, त्यामध्ये होणाऱ्या कारवाया या सगळ्या जनतेच्या हिताच्या असतात आणि सत्ताधाऱ्यांच्या फायद्याच्या नसतात असं म्हणणं धारिष्ट्याचे ठरेल. आता पुढील आठवडे या संघर्षाला कोणत्या वळणावर घेऊन जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# स्वातंत्र्यलढ्याचे आद्यप्रवर्तक - लोकमान्य टिळक

**भारतावर इंग्रजांचे वर्चस्व असताना भारतभूमीस इंग्रजांच्या गुलामगिरीच्या पाशातून सोडविण्यासाठी अहोरात्र झटणारी काही नररत्ने आपल्या देशात होऊन गेली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे त्यातीलच एक दैदिप्यमान रत्न ! त्यांच्या स्मृती दिनानिमित्त एका कणखर आणि जाज्वल्य नेतृत्वाचा थोडक्यात परिचय....**



स्वदेशी, बहिष्कार, शिक्षण आणि स्वराज्य या चतु:सूत्रीचा टिळकांनी नेहमीच पुरस्कार केला. ते हिंदुस्थानातील राजकीय असंतोषाचे जनक तसेच आधुनिक भारताचे एक शिल्पकार होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी सिंहगर्जना करणाऱ्या टिळकांनी आपले संपूर्ण आयुष्य भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ब्रिटीशांशी लढण्यात घालविले. कुशाग्र बुद्धीमत्तेचे, प्रखर देशभक्त, निर्भीड पत्रकार, लेखक आणि स्पष्टवक्ते असणाऱ्या, अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या टिळकांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव या कार्यक्रमांची सुरुवात करून लोकांमध्ये सांस्कृतिक राष्ट्रवाद निर्माण केला. ब्रिटीशांनी 'भारतीय असंतोषाचे जनक' असे बिरुद दिलेल्या टिळकांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि उत्कर्षासाठी 'शिक्षण' ही मूलभूत गरज मानून 'केसरी' आणि 'मराठा' ही वृत्तपत्रे सुरु करून लोकांना संघटीत आणि शिक्षित केले तर 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना करून तरुणांना देशप्रेमाची शिकवण दिली.

२३ जुलै १८५६ मध्ये रत्नागिरी येथे लोकमान्यांचा जन्म झाला. पुत्र प्राप्तीसाठी मातेने उपवास आणि कठीण व्रत केले आणि सूर्यदेवाच्या कृपाप्रसादाने जन्मलेल्या या बाळाने ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अस्त घडवून आणला. लहानपणापासूनच कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या टिळकांचे विचार स्वतंत्र आणि वेगळे होते. गणित हा त्यांचा आवडता विषय. कितीतरी कठीण गणिते ते सहजपणे सोडवत असत. तथापि, स्पष्टवक्तेपणा-मुळे शिक्षकांना ते आवडत नसत. ते शाळेत असतानाची एक घटना प्रसिद्ध आहे. एकदा शिक्षक वर्गात नसताना काही मुलांनी शेंगा खाऊन टरफले वर्गातच टाकली होती. शिक्षकांच्या हे लक्षात आल्यानंतर त्यांनी रागावून टरफलांविषयी विचारले असता कुणीच स्वतःहून पुढे येईना. तेव्हा त्यांनी वर्गातील सर्व मुलांना टरफले उचलण्यास सांगितले. पण टिळकांनी टरफले उचलण्यास नकार दिला. 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत, मी टरफले उचलणार नाही' असे बाणेदार उत्तर त्यांनी दिले. प्रकृतीने अशक्त असणाऱ्या टिळकांनी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर नियमित व्यायाम आणि पौष्टिक आहार घेऊन प्रकृती बळकट केली आणि सर्व खेळांत प्रथम क्रमांक पटकावला. ते उत्तम मल्ल आणि पोहणारे म्हणून नावाजले गेले. १८७७ मध्ये टिळक गणितात प्रथम वर्गामध्ये बी.ए. झाले. पुढे त्यांनी एल.एल.बी. ही पदवी संपादन केली.

तथापि नोकरी न करता आगरकरांच्या सहकार्याने १८८० मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल' ची स्थापना केली. लोकांना संघटीत करून इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांना तयार केले. बालविवाहाला विरोध, विधवाविवाह आदी सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी ब्रिटीश सरकारविरुद्ध संघर्ष केला. नंतरच्या काळात दोघांमध्ये तात्त्विक मतभेद झाल्याने टिळकांनी कर्जासह 'केसरी'चे संपादकपद स्वतःकडे घेतले. टिळकांचे अग्रलेख हाच 'केसरी'चा आत्मा होता. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय', 'उजाडले, पण सूर्य कुठे आहे,' 'टिळक सुटले पुढे काय', 'प्रिन्सिपॉल, शिशुपाल की पशुपाल', 'टोणग्याचे आचळ', 'हे आमचे गुरूच नव्हेत', 'बादशहा ब्राह्मण झाले', 'पुनश्च हरि ॐ!' हे त्यांचे काही प्रसिद्ध अग्रलेख. टिळक हे सुरवातीपासूनच जहालमतवादी असल्याने त्यांनी १८९० मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश करताच पक्षाच्या मवाळ विचारसरणीला विरोध केला. काँग्रेस पक्षातील लाला लजपतराय, आणि बिपिनचंद्र पाल यांची राजकीय मते त्यांच्याशी जुळणारी होती. यामुळे या त्रिकुटाला लाल-बाल-पाल असे नामकरण मिळाले व पुढे हे त्रिकुट देशाच्या राजकारणात बरेच गाजले. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी लिहिलेला 'गीतारहस्य' हा ग्रंथ अक्षय विचारधन असून त्यात त्यांनी ज्या कर्मयोगाचा पुरस्कार केला आहे तो प्रत्यक्ष जीवनात त्यांनी आचरणात आणला.

**गणिताचा व्यासंग**

टिळकांना गणित विषयापैकी बीजभूमिती (अनालीटीकल जॉमेट्री) हा विषय विशेष आवडे. त्यांची अभ्यास करण्याची पद्धती अनालीटीकल म्हणजेच विवेचक बुद्धीची असे, केवळ पुस्तकातील विवेचनाने संतुष्ट न होता, स्वतः विषयाचे उभे-आडवे विभाग पाडून स्वतःची बुद्धी चालवून ते त्या विषयाची काहीतरी नवीन मांडणी करीत. कॅल्कुलस वर ग्रंथ लिहिण्याचेही टिळकांच्या मनात होते. यासंबंधी ते स्वतंत्र उपपत्ती बसवत असून, ती पूर्ण झाल्यावर इंग्रजीमध्ये ग्रंथ लिहिणार असल्याचे त्यांनी सांगितल्याचे उल्लेख आढळतात. पुणे येथील केसरी ग्रंथालयातील उपलब्ध लोकमान्यांच्या एका वहीमध्ये (२५ ऑगस्ट १९१०) भूमितीत ज्या वक्रास विवृत्त (इलीप्स) म्हणतात त्याच्या काही गुणधर्मांची ते पडताळणी करत असल्याचे आढळते. अवकाशातील ग्रहांचे भ्रमण मार्ग विवृत्तीय असतात, म्हणून तर अभ्यासासाठी लोकमान्यांनी विवृत्ताची निवड केली असेल, असा विचार येतो. त्यांनी विवृत्ताचे कार्तेशीय तसेच प्राचलिक निर्देशक घेऊन समाकलनाच्या रीतीने विवृत्ताचे क्षेत्रफळ यशस्वीरीत्या काढले आहे. तथापि, विवृत्ताच्या धनूची लांबी काढण्यासाठी वारंवार गणित करूनही समाकलनाच्या प्राथमिक रीतीने निर्णायक उत्तर मिळत नाही. तथापि, समाकलनाच्या प्राथमिक रीतीने विवृत्ताची लांबी अशक्य आहे, असा जरी त्यांनी निष्कर्ष काढला असता, तरी तो संशोधनातील एक टप्पा ठरला असता. तुरुंगातील एकाकीपणात लोकमान्यांनी जो कंटाळवाणा वेळ बौद्धिक आनंदात व्यतीत केला, ज्यातून गीतारहस्य सारखे जे अमृत निष्पन्न झाले, ते 'कॅल्कुलस' वरील ग्रंथ संपन्न होऊन जरी झाले नसले तरी या उपलब्ध वहीवरून टिळकांची गणिताची आवड वरवरची नसून किती सखोल होती, हे लक्षात येते.

लोकमान्यांच्या गणिती बुद्धिमत्तेचा आणखी एक चमकदार पैलू म्हणजे त्यांनी ज्योतिर्गणिताच्या सहाय्याने निश्चित्त केलेला वेदांचा काळ. जर्मन पंडित मैक्समुल्लर ने इ.स. पूर्व १२०० च्या सुमारास वेद लिहिले गेले असावेत, असा सिद्धांत मांडला. तथापि, लोकमान्यांचे गणिती मन हे कबूल करीत नव्हते. शरद संपातात सूर्य आपल्या डोक्यावर असताना मकरवृत्तातून तो उत्तरेकडे सरकतो, प्राचीन ग्रंथातील शरद संपात कोणत्या नक्षत्रात आहे त्याचे उल्लेख व संदर्भ, ऋग्वेदातील शरद संपात मृगशीर्षात आहे असा उल्लेख, मृगशीर्षला अग्रहायन ही पर्यायी संज्ञा, जिला ग्रीक भाषेत 'ओरायन' म्हणतात तसेच श्रीकृष्णाने भगवद्गीतेतील 'मासांना मार्गशीर्षोहम' म्हटल्याचे लोकमान्यांच्या लक्षात आले आणि त्यांना 'मृगशीर्ष' आणि 'मार्गशीर्ष' यातील साम्य इतके भावले की त्यांनी ज्योतिर्गणिताच्या आधारे वेदांचा काळ इ.पू. ४००० वर्षापासून ते इ.पू. २५०० वर्षापर्यत असावा, असा निष्कर्ष काढला. पुढे लोकमान्यांनी या संशोधनावर आधारित 'ओरायन' हा ग्रंथ लिहिला, जो विद्वज्जनांनी नावाजला. या उदाहरणावरून गणिताचा चौफेर उपयोग कसा करता येतो ते लोकमान्यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या जयंती-पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या गणितप्रेमाचा ध्यास सर्वांनी घेतल्यास तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

लोकसंग्रहाची दृष्टी राखून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीला समाजातील सर्व थरांतील लोकांचे अधिष्ठान मिळवून दिले. गांधीजींच्या राजकीय-सांस्कृतिक कार्याला अनुकूल अशी पार्श्वभूमी लोकमान्यांनी निर्माण केली, असे म्हटले तर उचित ठरेल. टिळकांनी भारतीय जनतेला एकत्र आणून आपल्या प्रखर विचारांनी सर्वांसमोर आदर्श निर्माण केला. म्हणूनच भारताच्या इतिहासात टिळक हे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे. त्यांना विनम्र आदरांजली !

**-विजय कोष्टी**
कवठे महांकाळ,
जि. सांगली मो. ९४२३८२९११७

# अण्णाभाऊचे लोकसाहित्य सदैव प्रेरणादायी

महाराष्ट्रात अनेक थोर समाजसुधारक, विचारवंत होऊन गेले. त्याच महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांची, फुले, शाहू, आंबेडकरांची कर्मभूमी म्हणून ओळखले जाते. त्यांचे विचार सदैव पुढे नेण्यासाठी असे अनेक समाजसुधारक पुढे आले. त्या समाजसुधारकांपैकी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे एक.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे जीवन काटेरी निवडुंगासारखे. अठरा विश्वदारिद्र्य त्यांच्या पाचवीलाच पूजलेले होते. अशा परिस्थितीत अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून समाजाला एक नवीन दिशा देण्याचे काम केले.

अण्णाभाऊ साठे यांचे नाव अण्णाभाऊ उर्फ तुकाराम. त्यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळकी तालुक्यातील वाटेगावात झाला. वडिलांचे नाव भाऊराव साठे तर आईचे नाव वालूबाई होते. भाऊराव साठे आपल्या परिस्थितीशी झुंज खेळत आपल्या मुलाबाळांना कसे जगवावे असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. दारिद्र्याने जखडलेल्या परिस्थितीशी झुंज खेळता खेळता अण्णाभाऊ साठे यांना शाळेत प्रवेश देण्याचे ठरवले. भाऊराव साठे यांना आपला संसार व समाजहितासाठी सर्वात मोठे शस्त्र



म्हणजे शिक्षण असे समजून त्यांनी आपल्या मुलाला शाळेत प्रवेश दिला. पहिल्याच दिवशी शाळेत गेल्यानंतर मास्तरांनी दिलेले धडे घरी येऊन पाठांतरीत न केल्यामुळे दुसऱ्या दिवशी मास्तरांनी अण्णाभाऊ साठे यांना घेतलेल्या धड्याबद्दलचे प्रश्न विचारता न आल्यामुळे हातावर छडीने मारून रक्तबंबाळ केले. अण्णाभाऊंच्या मनामध्ये संताप निर्माण झाला. अण्णाभाऊ शाळा सुटल्यानंतर रस्त्यावरचा दगड घेऊन मास्तरांचं डोकं फोडून घरी आले. त्या दिवशी अण्णाभाऊ साठेंची शाळेपासून कायमची सुटका झाली. म्हणून अण्णाभाऊ साठेंना फक्त दीड दिवस शाळा शिकण्याचा योग लाभलेला होता.

अण्णाभाऊ साठे हे मांग अस्पृश्य समाजामध्ये जन्मलेले होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतीशीलतेवर आधारलेले होते. सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवाद विचारांचा पगडा होता. त्यांनी आपल्या लिखाणाच्या माध्यमातून महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रूजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, द. न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कला पथकाचे कार्यक्रम सादर करून समाज परिवर्तन घडवून आणले.

अण्णाभाऊ साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंबऱ्या लिहिल्या. त्यामध्ये फकीरा इ. स. (१९५९) समाविष्ट आहे. या कादंबरीला इ.स. १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. साठेंच्या लघुकथांचा संग्रह १५ तर ज्यामध्ये मोठ्या संख्येने बऱ्याच भारतीय भाषांमध्ये २७ अभारतीय भाषांमध्ये भाषांतरित केले आहे. १५ नाटके, १२ पटकथा, मराठी पोवाडा शैलीतील १० गाणी, माझा रशियाचा प्रवास असे साहित्य लिहून साहित्याला आजरामर केले. ४९ वर्षांचे आयुष्य जगलेल्या या कलंदर साहित्यिकाने स्वकर्तृत्त्वाने आपले नाव साहित्य क्षेत्रात मोठे केले. वाट्याला आलेलया परिस्थितीत संघर्ष करीत दुःखाचे पहाड शोषीत, पीडितांचे जगणे साहित्यात अधोरेखीत केले. माणसाला माणून म्हणून जगण्याचा खरा आविष्कार साहित्यातून निर्माण केला. कादंबरी फकीरा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्पण करून समाजाला परिर्वनाच्या दिशेने जाण्याचे उपदेश केले. शेवटी असे सांगितले की, जग बदन घालून घाव, मज सांगून गेले भीमराव. अशा पद्धतीने आज समाजाला खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची गरज आहे. म्हणून त्यांच्या झुंजार लेखीस मानाचा सलाम.

**-प्रा. तुकाराम बोईवाड**
सायन्य कॉलेज, नांदेड
मो. ८९९९२७३६२२

# सामाजिक बांधिलकी जपणारे दानशूर व्यक्तिमत्व संतोष कुलकर्णी

बिलोली शहरातील व तालुक्यातील सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे व आपल्या सामाजिक कार्यातून संपूर्ण जिल्ह्यात आपली वेगळी आ-ळख निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे संतोष कुलकर्णी. आज या दानशूर व्यक्तिमत्वाचा वाढदिवस त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्वावर थोडक्यात प्रकाश टाकण्यात आला आहे.



संतोष कुलकर्णी यांनी कमी वयातच आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, सन २००७ पासून त्यांनी बिलो-ली शहराच्या राजकारणाला सुरुवात केली. बिलोली शहरातील पत्नी-पत्नी नगराध्यक्ष होण्याचा बहुमान संतोष कुलकर्णी व त्यांच्या पत्नी सौ. मैथिली संतोष कुलकर्णी यांना मिळाला आहे. स्वतःचा समाज अल्प असला तरी संतोष कुलकर्णी यांना सर्व जाती, धर्माचा पाठबळ मिळालं हे विशेष.

सर्वधार्मियांच्या धार्मिक सण उत्सवात ते स्वतः सहभागी असतात. गोरगरीब कुटुंबियांना लग्नासाठी, उपचारासाठी वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत, गोरगरीब गरजूना आर्थिक मदत, यासारखे सामाजिक कार्य त्यांच्या हातून सतत होत असते. गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, उर्स, संदल, अनेक महापुरुषांच्या जयंतीत ते सामाजिक बांधिलकी जपत सहभागी होतात.त्यामुळे आज सर्व जाती धर्मातील नागरिक त्यांच्या सोबत जोडल्या जात आहेत. कोरोनाच्या काळातही त्यांनी गोर गरीब गरजू लोकांना जीवनावश्यक वस्तू, व अन्नदान सारखे सामाजिक उपक्रम राबवित अनेकांना मदत केली.

कुलकर्णी यांची लोकप्रियता दिवासेंदिवस वाढत आहे. त्यांचे सर्व राजकीय व्यक्ती सोबत चांगले हितसंबंध असल्याने जनतेचे कामे व विकास कामे करण्यास कांहीही अडचण येत नाही. अशा सर्व जाती धर्मास सोबत घेऊन चालणाऱ्या व राजकारणात असूनही सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तिमत्वास वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.

# शेतकरी व सामान्यांचे नेतृत्व आ. आनंदराव बोंढारकर

शिवसेनेच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील राजकारणात पाय ठेवलेल्या आनंदराव बोंढारकर या तरुणाने आपल्या कार्यकर्तृत्वांने व प्रामाणिकपणामुळे शिवसेनेचे नेते तथा आमदार हेमंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. शेतकरी कुटुंबातून जन्मास आलेले आ. बोंढारकर हे अगदी तरुण वयापासूनच शिवसेनेच्या हिंदुत्ववादी विचारसरणीने भारावले होते.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांची हिंदुत्ववादी विचारसरणी अंगीकरताना शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे आणि शिवसेना नेते ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेल्या राजकारणात त्यांचा यशाचा आलेख दिवसेंदिवस चढत गेला आणि लोककल्याणाच्या कामाची पावती म्हणून नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना प्रचंड मतांनी विजयी केले.

नांदेड जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा असल्याने येथे सतत दुष्काळ, अपुरा पाणीपुरवठा, हमीभावाचा अभाव, वीज पुरवठ्याच्या अडचणी अशा अनेक समस्यांनी शेतकरी त्रस्त आहे. अशा परिस्थितीत बोंढारकर यांनी शेतकऱ्यांसाठी विविध पातळ्यांवर आवाज उठवला आहे. विधानसभेतही शेतकरी हिताचे प्रश्न मांडले. नांदेड दक्षिण मतदारसंघातील अनेक गावांमध्ये टंचाईच्या प्रश्नावर जलसंधारण योजना आणि जलयुक्त शिवार योजनेतून ठोस कामगिरी.अनेक गावे टंचाईमुक्त केली.निष्कलंक चरित्र मान्यता म्हणूनही आमदार आनंदराव भांडारकर यांच्याकडे पाहिले जाते. जिल्हाप्रमुख पदापासून ते आमदारकीपर्यंत मजल मारणाऱ्या आ. बोंढारकर यांच्यामध्ये कधीही गर्व, अहंकार जाणवला नाही. आ. आनंदराव बोंढारकर यांचा वाढदिवस म्हणजे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तमाम जनतेचा आनंद उत्सवच आहे . एवढेच नाही तर नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या लेकराचा हा वाढदिवस असल्याने आजचा वाढदिवस अत्यंत आनंददायी असा आहे. शेतकऱ्यांसाठी , लोकसेवेसाठी आणि लोककल्याणासाठी आ. आनंदराव बोंढारकर यांना दीर्घ आयुष्य मिळो . निरोगी आरोग्य मिळो हीच गुरुचरणी प्रार्थना.

**-स. दर्शनसिंग सिद्धू**
सह संपर्कप्रमुख,
शिवसेना नांदेड

# जनमानसातील नेतृत्त्व : आ. आनंदराव बोंढारकर

आज नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधी, सर्वसामान्यांच्या हक्कांचा बुलंद आवाज, आ. आनंदराव बोंढारकर यांचा वाढदिवस. ही केवळ एक वैयक्तिक दिनविशेष नसून, हजारो जनतेच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कार्यकर्त्याच्या जीवनातील महत्त्वाचा दिवस आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे गटनेते नामदार हेमंत पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली सामान्य तरुणास विधानसभेत आमदार म्हणून पाठवण्याचे काम नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील जनतेने केले आहे. आनंदराव बोंढारकर एक सामान्य कार्यकर्ता, शिवसैनिक आणि जिल्हाप्रमुख म्हणून काम करत राहिले. गोरगरिबांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हा त्यांचा स्थायीभाव. त्यामुळे अपसुकच असंख्य नागरिकांशी त्यांचे स्नेहाचे आणि जिव्हाळ्याचे नाते जुळले आहेत. पक्षाने जी जबाबदारी आपल्या खांद्यावर सोपवली ती जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या आ. आनंदराव बोंढारकर यांनी जिल्हाप्रमुख म्हणूनही सामाजिक न्याय हक्कासाठी अनेक आंदोलने केली. परिणामी त्यांना मतदारांनी आमदार म्हणून निवडून दिले ही त्यांच्या कामाची पावती आहे.

आ. बोंढारकर हे केवळ एक राजकारणी नाहीत, तर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, त्यांच्या प्रत्येक समस्या स्वतःची मानून लढणारे एक



कार्यशील नेतृत्व आहे. त्यांनी नांदेड दक्षिण मतदारसंघात विविध विकासकामांच्या माध्यमातून आपली असामान्य कार्यक्षमता सिद्ध केली आहे. रस्त्यांची सुधारणा, पाणीपुरवठा, शिक्षण सुविधा, आरोग्य व्यवस्था आणि बेरोजगारीसारख्या गंभीर समस्यांवर त्यांनी प्रभावी उपाययोजना राबवल्या. त्यांचे काम हे केवळ सभागृहात भाषणांपुरते मर्यादित नाही, तर ते प्रत्यक्ष मैदानात उतरून जनतेच्या गाठीभेटी घेतात, त्यांच्या अडचणी समजून घेतात आणि तत्काळ प्रशासनाकडून त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. 'जनता हीच खरी मालक' या तत्त्वावर विश्वास ठेवून, त्यांनी सदैव पारदर्शक व लोकाभिमुख कारभार केला आहे. त्यांचा संयम, अभ्यासूवृत्ती आणि सर्वसामान्य जनतेशी असलेली आपुलकी यामुळेच आज ते लाखो जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली नांदेड दक्षिण मतदारसंघाने एक नवे रूप धारण केले आहे आणि हा प्रवास अजूनही प्रगतीच्या दिशेने सुरू आहे.

आनंदराव बोंढारकर हे केवळ समस्यांचे राजकारण न करता, समाधानाच्या दिशेने प्रयत्न करणारे नेते आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात खालीलप्रमाणे विविध विकासकामे झाली आहेत. ग्रामीण रस्ते आणि पाणी योजना: विविध गावांमध्ये रस्त्यांचे डांबरीकरण, जलवाहिनी टाकणे, पिण्याच्या पाण्याच्या योजना राबविल्या आहेत.

कोरोना काळातील सेवा अत्यंत जिव्हाळ्याची ठरली आहे. लॉकडाऊनच्या काळात अन्नधान्य वाटप, औषध पुरवठा, आरोग्य शिबिरे आयोजित केली आहेत. या काळात सामान्य जणांच्या हितासाठी बोंढारकर यांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. त्यामुळे आज आनंदराव बोंढारकर यांचा वाढदिवस साजरा करताना, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करणे हे फक्त औपचारिकता नाही, तर त्यांच्या संघर्षमय प्रवासाचे आणि समर्पित नेतृत्वाचे कौतुक करण्याची संधी आहे. शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करणारा, सामान्यांचा खरा प्रतिनिधी, आणि विकासाचा पुरस्कर्ता म्हणून बोंढारकर यांचे योगदान अविस्मरणीय आहे. वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आगामी वाटचालीसाठी यशाच्या शुभेच्छा!

**-श्याम पाटील वानखेडे**
शिवसैनिक, नांदेड

# रेल्वे स्थानकातून मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीची पोलिसांनी काढली धिंड



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद पोलिसांनी बुधवार, दि. २९ जुलै रोजी हुजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानक परिसरातून एका असहाय्य मुलीचे अपहरण करणाऱ्या दोघांपैकी एक असलेल्या मोहम्मद खाजा मोहम्मद अयान रा.इकबालनगर, नांदेड याची धिंड काढली. न्यायालयासमोरून ते संपुर्ण रेल्वे स्थानक परिसरात ही धिंड काढली.

यापूर्वी दोन वेळेस नांदेड ग्राम ीणचे तत्कालीन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी अशी धिंड काढली होती. परत वजिराबादचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनीही आरोपीची धिंड काढून गुन्हेगारांमध्ये भीती तर सर्वसामान्य नागरिकांमध्ये एक विश्वासाचे वातावरण निर्माण केले.

वजिराबादचे पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम, पोलीस उपनिरिक्षक सुनील बुलंगे, पोलीस अंमलदार साखरे, गव्हानकर, यादव आणि काही गृहरक्षक दलाचे जवान हे यावेळी उपस्थित होते.

या दोन आरोपींनी बुधवारी भरदिवसा रेल्वे स्थानक परिसरातून एका असहाय्य मुलीला जबरदस्तीने उचलून नेऊन परिसरात दहशत पसरली होती, मात्र पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक आणि पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेत दोन्ही आरोपींना अटक केली. यातील एक जण अल्पवयीन आहे. वजिराबाद पोलीस ठाण्यात पीडित मुलीच्या बहिणीच्या फिर्यादीवरून अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासीक अंमलदार सहायक पोलीस निरीक्षक लोंढे यांनी आरोपीला गुरुवार, दि. ३१ जुलै रोजी नांदेड न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पोलीस कोठडीत पाठवले आहे.

# महसूल सप्ताहात जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन –जिल्हाधिकारी

## १ ते ७ ऑगस्ट कालावधीत महसूल सप्ताह होणार साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट २०२५ रोजी 'महसूल दिन आणि १ ते ७ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत 'महसूल सप्ताह-२०२५' साजरा करण्यात येणार आहे. महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील नागरिकांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

महसूल दिन व महसूल सप्ताहात विशेष उपक्रम राबविण्याबाबत गुरूवारी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या. यावेळी विभागातील सर्व जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे तर प्रत्यक्ष अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, तहसिलदार विपीन पाटील, शंकर लाड आदींची उपस्थिती होती.

या सप्ताहात प्रत्येक दिवशी तहसिल कार्यालयामार्फत समाजाच्या विविध घटकांतील नागरिकांसाठी विशेष मोहिम,



कार्यक्रम, उपक्रम, शिबीरे, महसूल अदातलीचे आयोजन करण्याबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांच्यासह सर्व महसूल अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे दिल्या.

महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यात विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार असून यात १५६ गावांत गाव तीथे स्मशानभूमी उभारण्यात येणार आहे. 'एम-सॅंड' धोरणाची अंमलबजावणी, गावातील जे मोठे रस्ते अतिक्रमण मुक्त झाले आहेत, तिथे दुतर्फा वृक्षारोपण करणार, ४ ऑगस्टपासून ऑनलाईन सुनावणीस प्रारंभ, भूसंपादनाचे सॉफ्टवेअर सुरु करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून या कामाला पुर्णत्वाकडे नेणार, महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तके अद्ययावत करण्याचे नियोजन केले असल्याचे माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिली आहे.

शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाचा शुभारंभ होणार आहे. या दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन केले आहे.

शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करण्यात येईल. रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे. सोमवार ४ ऑगस्ट रोजी प्रत्येक मंडळनिहाय 'छत्रपती शिवाजी महाराज म हाराजस्व अभियान' राबविण्यात येईल. मंगळवार ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांचे थेट लाभ हस्तांतरण झालेले नाही, त्यांना घरभेटी देऊन डीबीटीद्वारे अनुदानाचे वाटप केले जाईल.

बुधवार, दि. ६ ऑगस्टला शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करून त्या अतिक्रमण मुक्त केल्या जातील. तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकारजमा करणे) निर्णय घेतले जातील.

गुरुवार, दि. ७ ऑगस्टला एम सॅंड धोरणाची अंमलबजावणी करून नवीन मानक कार्यप्रणालीनुसार धोरण पूर्णत्वास नेले जाईल आणि 'महसूल सप्ताहाचा' सांगता सम ारंभ आयोजित केला जाईल. या महसूल सप्ताहात नांदेड जिल्ह्यातील नागरिकांनी आपला उस्फुर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# शासकीय वाळू डेपोतून गरजू ग्राहकास घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील घरकुल लाभार्थी व खाजगी ग्राहकांना १ ऑगस्ट २०२५ पासून आपल्या जवळच्या वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी संबंधीत गरजु ग्राहकांना ऑनलाईनद्वारे महाखनिज प्रणालीवर सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कालावधीत (सार्वजनिक सुट्टी वगळून) वाळू बुकिंग करुन बुकिंग केलेल्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत वाळू डेपोतून वाळू उचल करणे बंधनकारक राहणार आहे.

त्यामुळे ज्या ग्राहकांना वाळूची आवश्यकता आहे, त्या ग्राहकांनी शासनाचे महाखनिज प्रणालीवर mahakhanij.maharashtra.gov.in ऑनलाईन बुकिंग करुन वाळू उचल करावी, असे प्रशासनाने जाहीर केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अधिकृत संकेतस्थळ nanded.gov.in वर प्रसिद्ध केले आहे.



**मुंबई :** नांदेडचे तत्कालीन सहायक पोलीस अधीक्षक तथा सध्या पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था) या पदावर कार्यरत डॉ. मनोजकुमार शर्मा यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानीत करण्यात आले. मुंबईत राजभवनात पार पडलेल्या पुरस्कार समारंभ सोहळ्यात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दुसऱ्या छायाचित्रात डॉ. मनोजकुमार शर्मा यांच्यासह श्रद्धा शर्मा आणि मानस शर्मा दिसत आहेत.

# मालेगाव स्फोट प्रकरणातील सातही आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई (प्रतिनिधी)–** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व सात आरोपींची निर्दोष सुटका करण्यात आली आहे. आरोपी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, मेजर रमेश शिवाजी उपाध्ये, समीर शरद कुलकर्णी, अजय एकनाथ राहिरकर, प्रसाद श्रीकांत पुरोहित, सुधाकर उदयभान धर द्विवेदी, सुधाकर ओंकारनाथ चतुर्वेदी यांची निर्दोष सुटका करण्यात आली आहे.

२९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगाव शहरात झालेल्या भीषण बॉम्बस्फोटाला जवळपास १७ वर्षे पूर्ण होत आहेत. भिक्खू चौकात घडलेल्या या स्फोटात सहा निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला, तर शंभरहून अधिक लोक गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे अनेक कुटुंबांचे आयुष्य उध्वस्त झाले. या प्रकरणाचा निकाल तब्बल १७ वर्षांनंतर (३१ जुलै रोजी) मुंबईतील एनआयएच्या विशेष न्यायालयात जाहीर करण्यात आला.

या खटल्यात साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह सात आरोपींना मृत्यूदंडाची शिक्षा द्यावी, अशी मागणी एनआयएने केली होती. त्यामुळे आजच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. २००८ मध्ये मालेगावच्या भिक्खू चौकात झालेल्या भीषण बॉम्बस्फोट प्रकरणात आज न्यायालयाने ऐतिहासिक निकाल देत सर्व सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. जवळपास १७ वर्षांनंतर आलेल्या या निकालानंतर कोर्टात सर्व आरोपी भावूक झाले. समीर कुलकर्णी यांना निकाल ऐकवताच अश्रू अनावर झाले. १७ वर्ष आम्ही आरोपी नव्हे, तर पिडीत होतो. आज आमचा पुनर्जन्म झाला, असे ते म्हणाले.

# माणिकराव कोकाटेंकडील कृषि खाते भरणेंकडे

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभेत रमी खेळणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिखाते बदलण्यात आलं आहे. कृषिखात्याची जबाबदारी आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आलं आहे. तर भरणे यांच्याकडे आधी असलेले क्रीडा आणि युवक कल्याण खाते कोकाटे यांच्याकडे देण्यात आलं आहे.

राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मंत्री माणिकराव कोकाटे हे विधानसभेत मोबाईलवर रमी खेळत होते. त्याचा व्हिडीओ रोहित पवारांनी पोस्ट केला होता. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा द्यावा यासाठी विरोधकांनी सरकारवर दबाव टाकला होता.

# पंडितराव देशमुख यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** शहरातील प्रतिष्ठीत नागरिक पंडितराव व्यंकटराव देशमुख (वय ९५ वर्षे) यांचे दि.३१ जुलै रोजी सकाळी ९ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजता अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

पंडितराव देशमुख यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, पाच मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते उद्योजक गजानन शंकरराव देशमुख यांचे आजोबा होत.

# गंगारामजी पाटील मुळे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील सांगवी खु. येथील प्रतिष्ठीत नागरिक माजी सरपंच गंगाराम जी रामराव पाटील मुळे (वय ७५ वर्षे) यांचे दि. ३१ जुलै रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथे खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले आहे.त्यांच्यावर गुरूवारी रोजी ४.३० वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.

गंगरामजी मुळे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते युवक काँग्रेसचे कार्यकर्ते गजानन मुळे यांचे चुलते होत.

# सौ.वसुंधरा देशमुख यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद भागातील प्रसिद्ध व्यावसायिक धनंजय देशमुख यांच्या सुविद्य पत्नी व खालसा हायस्कूलमधून स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या सहशिक्षिका सौ. वसुंधरा देशमुख (५७) यांचे दि. ३१ जुलै रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी सायंकाळी ५.३० वाजता गोवर्धन घाट येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात सासू विजया देशमुख, पती धनंजय, मुलगा डॉ. अथर्व, मुलगी सौ.प्राची, जावई, नातू, दीर भूषण उर्फ राजू, सौ. शैलजा, उमेश उर्फ हेमू देशमुख, सौ.स्वाती, पुतण्या, पुतणी,भाऊ, वहिनी, भाचे असा परिवार आहे.

# दत्ताहरी मेहत्रे यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** तालुक्यातील डोंगरगाव येथील रहिवासी दत्ताहरी मारोती पाटील मेहत्रे (वय ४५ वर्षे) यांचे दि. ३१ जुलै २०२५ रोजी पहाटे पुणे येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. दत्ताहारी मेहत्रे यांच्या पार्थिवावर दुपारी ३ वाजता डोंगरगाव ता. नायगाव जि.नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, चार मुली, दोन बहिणी, एक भाऊ असा परिवार आहे. ते पुणे येथे एका कंपनीत कामाला होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# डीवायएसपी सुशीलकुमार नायक यांची हिंगणघाट येथे बदली तर नांदेड शहराला रामेश्वर व्यंजने येणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव वेंकटेश भट्ट यांनी राज्यातील ६५ उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश जारी केला आहे. त्यात नांदेड इतवारा उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून उत्कृष्ट कार्य केलेले सुशीलकुमार नायक यांची बदली हिंगणघाट (जि. वर्धा) येथे करण्यात आली आहे. तर नांदेड शहर उपविभागासाठी रामेश्वर व्यंजने यांना पाठविण्यात आले आहे.

नांदेड शहर आणि ग्रामीण भागात आपल्या कामाचा ठसा उमटविणारे आणि अनेक गुन्हेगारांना त्यांची जागा दाखवून देणारे इतवारा उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांची बदली वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट उपविभागात याच पदावर करण्यात आली आहे. तर नांदेड शहर उपविभागासाठी सहायक पोलीस अधीक्षक सी. एम. कीर्तीका यांच्या ठिकाणी पदस्थापनेच्या प्रतीक्षेत असलेले रामेश्वर व्यंजने यांना पाठविण्यात आले आहे. राज्यातील जवळपास ६५ रापोसे पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या गुरुवारी करण्यात आल्या आहेत.

# आ. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज लोहा येथे इंदुरीकर महाराजांचे कीर्तन

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दि. १ ऑगस्ट रोजी लोहा येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हभप निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तन सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक संग्राम मोरे यांनी केले आहे.



लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघात आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस याही वर्षी विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येत आहे. संग्राम मोरे यांच्या पुढाकारातून याही वर्षी लोहा येथे कै. बालाजी पाटील पवार मंगल कार्यालयात सायंकाळी पाच वाजता हरिभक्त पारायण निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस मधील अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कीर्तन सोहळ्यास इंदुरीकर महाराजांच्या भजनी कीर्तन सोहळ्याचा भाविक भक्तांनी आणि आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक संग्राम मोरे यांनी केले आहे.

# लॉजवर आलेल्या पॅसेंजरची दुकानदारास जबर मारहाण

**माहूर (प्रतिनिधी)–** माहूर बसस्थानकासमोरील राधिका लॉजमध्ये आलेल्या एका पॅसेंजर बाजुच्या दुकानासमोर गाडी लावली. दुकानासमोरील लावेली गाडी काढून घ्या, असे म्हणता पॅसेंजरने दुकानदारास जबर मारहाण केली. या प्रकरणी पॅसेंजर व लॉज मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप जयस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. ३१ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजेच्या दरम्यान मी माझे ओम मोबाईल मॅजिक दुकान उघडले. यावेळी दुकान उघडत असताना माझ्या दुकानासमोर लावलेली एम.एच. ०४- एफआर-०४५७ चारचाकी गाडी बाजुच्या लॉजवर थांबलेल्या पॅसेंजरला काढण्यास सांगितले. मला गाडी का काढण्यास लावली या कारणावरून पॅसेंजर वैभव भगवान पठाणे रा. पुसद याने मला माझ्या दुकानात येऊन शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी शेजारी असणारे शेख सद्दाम शेख जब्बार, जावेन दखान अजी खान पठत्तण हे भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही नंतर बघून घेतो असे म्हणून निघून गेला. या प्रकरणी दिलीप जयस्वाल यांच्या तक्रारीवरून वैभव पठाडे (३०), व लॉज मालक प्रभू मेहता यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप अन्येबोईनवाड करीत आहेत.

# कृत्रिम वाळूचा वापर करण्यासाठी धोरण जाहीर जमिनीची माहिती सादर करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महसूल व वन विभागाचा शासन निर्णय २३ मे २०२५ अन्वये नैसर्गिक वाळूला एम-सॅन्ड (कृत्रिम वाळू) पर्याय म्हणून विकास करण्याच्या अनुषंगाने शासनाने धोरण जाहीर केले आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने २८ जुलै २०२५ रोजी दिलेल्या प्रसिद्धी पत्रका प्रमाणे माहिती व अर्ज १४ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यंत सादर करावेत असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

शासनाकडे किंवा कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे निहित असलेल्या कोणत्याही जमिनीवर मंजूर करावयाच्या खाणपट्ट्याबाबत पाच एकरापर्यंतच्या क्षेत्रासाठी लिलाव करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची माहिती तहसिलदार यांनी १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत सादर करावी. इच्छुक व्यक्तींनी mahakhanij.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर १४ ऑगस्ट २०२५ रोजी पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत.

यापुर्वीपासून खाणपटटा मंजूर असलेल्या खाणपटटाधारकांनी १०० टक्के एम-सॅन्ड उत्पादन करण्यास इच्छुक असल्याबाबत अर्ज ıahakhanij.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सादर करावेत. याबाबत सविस्तर प्रसिध्दीपत्रक जिल्हाधिकारी नांदेड यांचे अधिकृत संकेतस्थळ (nanded.gov.in) वर प्रसिध्द केले आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालय येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.

# नीती आयोगाच्या संपूर्णतः अभियानात उल्लेखनीय प्रगतीमध्ये किनवटचा समावेश

## जिल्हाधिकाऱ्यांचा नीती आयोग व राज्यशासनाच्यावतीने २ ऑगस्ट रोजी नागपूर येथे सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नीती आयोगाच्यावतीने जुलै ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या संपूर्णता अभियानात आकांक्षित किनवट तालुक्याने ६ निर्देशकांपैकी ४ निर्देशक १०० टक्के पूर्ण केल्यामुळे राज्यातुन तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकाविले आहे. याबद्दल राज्य शासनाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि तत्कालीन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचा आयआयएम नागपूर येथे २ ऑगस्ट २०२५ रोजी पदक व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

नीती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत जुलै ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत संपूर्णता अभियान राबविण्यात आले. देशभरातील ५०० तालुके यात सहभागी झाले. या अभियानात आरोग्य, पोषण, कृषी आणि सामाजिक विकास या क्षेत्रांतर्गत ६ निर्देशकांचा समावेश करण्यात आला होता. संपूर्णता अभियानात राज्यातील २७ आकांक्षित तालुक्यानी सहभाग घेतला होता. यात पहिल्या क्रमांकावर चंद्रपूर - जिवती, दुसऱ्या क्रमांकावर वाशीम - मालेगाव, पालघर - जवाहर तर तिसऱ्या क्रमांकावर नांदेड-किनवट, वर्धा - कारंजा, यवतमाळ-पुसद, गडचिरोली-अहेरी, नंदुरबार-अकराणी या आकांक्षित तालुक्यानी स्थान पटकाविला आहे.

तालुक्यातील गर्भवती महिलांचे पहिल्या तिमाहीतील नोंदणीचे प्रमाण १०० टक्के करणे. तालुक्यातील ३० पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींची उच्च रक्तदाब संदर्भात १०० टक्के तपासणी करणे. तालुक्यातील ३० पेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तींची मधुमेह संदर्भात १०० टक्के तपासणी करणे. तालुक्यातील गर्भवती महिलांना आयसीडीएसच्या पूरक पोषण आहार वितरण कार्यक्रमांतर्गत १०० टक्के पूरक पोषण आहाराचे वितरण करणे. मृदा आरोग्य तपासणी कार्ड १०० टक्के वितरण करणे. तालुक्यातील महिला स्वयं सहायता समूहाना खेळत्या भांडवलाचे १०० टक्के वितरण करणे. संपूर्णतः अभियानाच्या माध्यमातून आकांक्षित किनवट तालुक्याने तालुक्यातील लक्ष्यित लोकसंख्येच्या तुलनेत मधुमेहासाठी तपासणी, उच्च रक्तदाबासाठी तपासणी, आयसीडीएस कार्यक्रमांतर्गत नियमितपणे पूरक पोषण आहार घेणाऱ्या गर्भवती महिलांची टक्केवारी आणि माती नमुना संकलन लक्ष्याविरुद्ध तयार केलेल्या मृदा आरोग्य कार्डांची टक्केवारी हे ४ निर्देशक १०० टक्के संतृप्त केले आहेत.

संपूर्णतः अभियान मोहिमेत योगदान दिलेल्या संबंधित तालुक्यातील गटविकास अधिकारी यांना पदक व प्रशस्तीपत्र तर तालुका कृषी अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि संबंधित विभागाचे गाव पातळीवर उल्लेखनीय काम केलेल्या कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

## थोडक्यात...

### सोलारचा शॉक लागल्याने एकाचा मृत्यू

**नांदेड (प्रतिनिधी)–** तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिंपळगाव शिवारात सुभाष रूपाजी खंदारे (वय ५२) हे विश्वनाथ वाघमारे यांच्या शेतात काम करण्यासाठी गेले होते. धुऱ्यावर पडलेल्या सोलारच्या तारेला त्यांचा स्पर्श झाला. यात डाव्या हातापासून ते खांद्यापर्यंत ते गंभीर भाजले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. हा प्रकार २८ जुलै ते २९ जुलैच्या दरम्यान घडला. अशोक शिंगणवाड या प्रकरणाचा तपास करून करत असून कपिल कदम यांच्या फिर्यादीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी न्याय व तत्परतेने सोडविण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. जिल्हा प्रशासनाच्यावतीने लोकशाही दिन सोमवार, दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे आयोजित केला आहे.

या दिवशी महसूल, गृह, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पाटबंधारे, बांधकाम, परिवहन, सहकार, कृषि विभाग व जिल्हा पाणी पुरवठा समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाचे लोकशाही दिनात प्रलंबीत प्रकरणे आहेत असे अधिकारी बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात उपस्थित राहतील. सकाळी १२ वाजेपासून निवेदनाची नोंदणी सुरु होणार आहे. त्यानंतर लगेचच प्राप्त झालेल्या अर्जावर, निवेदनावर म्हणणे ऐकून घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली आहे.

# स्वा. सावरकर स्वयंभू व्यक्तिमत्व होते -योगेश सोमण

## स्वा.सावरकर जयंती महोत्सवानिमित्त व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वातंत्र्यवीर सावरकरांची साहित्य निर्मिती आणि लेखन हे उत्स्फूर्त होते. त्यांना कुठल्याही प्रकारचा राजकीय वारसा नव्हता राजकीयदृष्ट्या स्वयंभू ते होते. भारताला संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य असले पाहिजे, या भूमिकेसाठी त्यांनी अविरतपणे कार्य केले प्रसंगी त्यांना शिक्षाही भोगावी लागली. सावरकरांची राष्ट्राप्रती असलेली राष्ट्रभक्ती आणि त्याचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन, सिने दिग्दर्शक तथा अभ्यासक योगेश सोमण यांनी केले. अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय आणि स्वा. सावरकर अध्यासन केंद्राच्यावतीने कुसुम सभागृह येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे, सचिव अॅड. वनिता जोशी, कोषाध्यक्ष कैलासचंद काला, सहसचिव धनंजय जोशी, प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम, डॉ. अर्चना भवानकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वा. सावरकर अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. संतोष कोटूरवार यांनी केले. व्याख्यानमालेचे उद्घाटन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद मुंबई केंद्र राष्ट्रीय सहसंघटन मंत्री देवदत्त जोशी यांनी केले.

यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्राच्यावतीने यावर्षीचा स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि अभ्यासक शेषराव मोरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात अॅड. दिलीप ठाकूर, डॉ. संतोष मालपाणी, डॉ. मल्हार लाटकर, डॉ.मुकुंद करंबेळकर आदींना नेताजी सुभाषचंद्र बोस गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी अभिवाचन स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात बालासाहेब पांडे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सावरकरांचे विचार पोहोचण्याचे काम केले जाणार आहे. स्वा. सावरकर जयंती महोत्सवानिमित्त विविध चांगले उपक्रम घेण्याचा मानस असल्याचा ते म्हणाले. सूत्रसंचालन डॉ.मनिष देशपांडे यांनी तर आभार डॉ. शंतनू कस्तुरे यांनी मानले.

**स्वा. सावरकर पुरस्कार माझ्या कामाची पावती –विचारवंत शेषराव मोरे**

स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्राच्यावतीने मला पहिला पुरस्कार दिला, तो माझ्या कार्याची दखल घेणारा आहे. या पुरस्काराने मी आनंदी आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाने स्वा. सावरकर अध्यासन केंद्र सुरू करणे ही कौतुकाची बाब आहे. या अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सावरकरांचे विचार, नव्या पिढीला माहीत होणार असल्याचे मत विचारवंत शेषराव मोरे यांनी व्यक्त केले.

**स्वा. सावरकर यांना भारतरत्न देण्याचा ठराव**

केंद्र शासनाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार द्यावा असा ठराव अभिनव भारत शिक्षण संस्थेच्यावतीने घेण्यात आला. या ठरावावर बहुसंख्य सावरकर प्रेमींनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# महापालिकेवर भगवा फडकवण्यासाठी कामाला लागा

## आ. बालाजीराव कल्याणकर यांची पदाधिकाऱ्यांना सूचना




**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी काळात होणाऱ्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी आतापासून कामाला लागा, अशा सूचना आ. बालाजीराव कल्याणकर यांनी दिल्या. आ. कल्याणकर यांच्या उपस्थितीत हॉटेल पद्मावती येथे नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची आणि शिवसैनिकांची बैठक पार पडली. या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हाध्यक्ष उमेश मुंडे, गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख शिवसेना, महिला जिल्हाप्रमुख अपर्णाताई नेरलकर, अॅड.श्याम बन, संदीपसिंह गाडीवाले, अॅड. धम्मपाल कदम, मुकुंद जवळगावकर, बाळासाहेब देशमुख, श्याम कोकाटे, राजेश चव्हाण, दीपाताई थोरवट, लताताई शेळके, धनंजय पावडे, गणेश बोकारे, माधव कोकाटे, मुन्ना राठोड, संतोष मादनवाड, मनोज ठाकूर, गणेशआप्पा हलकोडे, ऋषिकेश नेरलकर, एकनाथ कल्याणकर, मंगेश कदम, सुनील सातारे, विकास देशमुख, मनमितसिंघ कुंजीवाले, प्रणव बोडखे, जयवंत केंद्रे, दिगंबर कल्याणकर, विठ्ठल खोंडे, बळवंत तेलंग, महेश तिडके, सचिन पाटील पोपळे, संतोष औंढेकर, अमित कासलीवाल, पप्पू सोनटक्के, पवन शिंदे, सुनील शिंदे, सुनील डोईजड यांच्यासह आदी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. कल्याणकर म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड विधानसभा नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात झालेल्या विकास कामाच्या बळावर या भागात शिवसेनेला दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून देण्याचे काम येथील सुजाण मतदारांनी केले आहे. या भागातील शिवसैनिक हा कट्टर शिवसैनिक आहे. त्याचा शिवसेनेवर प्रचंड विश्वास आहे. विकास कामावर विश्वास आहे. त्यामुळे आगामी काळातही या भागातून शिवसैनिक शिवसेनेलाच मतदान करतील. गेल्या सहा वर्षांच्या काळात नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात झालेली विकास कामे हीच आपली खऱ्या कामाची पोचपावती आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आगामी काळात लढल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना ताकतीने लढणार आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेवर आता भगवा फडकवण्याची वेळ आली असल्याने प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिक आपापले हेवेदावे बाजूला ठेवून कामाला लागण्याची वेळ आली आहे. या भागात झालेल्या विकास कामाची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचण्यासाठी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधावा, असे आवाहन त्यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांना केले.

# २०२४ सालचा पिकविमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करा

## खा. रवींद्र चव्हाण यांची लोकसभेत मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील वर्ष २०२४ मधील विविध पिकांचा पीक विमा लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर अजूनही जमा झाला नसल्याने शेतकरी सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. सर्व पिकांच्या पीक विम्याची रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ जमा करावी, अशी मागणी खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी लोकसभेत केली. लोकसभेत बोलत असतंना खा. चव्हाण यांनी शेतकऱ्यांच्या संदर्भातील जिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या विषयांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.




दीड महिन्यांपूर्वी नांदेड जिल्ह्यातील मुदखेड, अर्धापूर, भोकर, हदगाव येथील केळी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. यासंदर्भाने केंद्र सरकारचे याविषयाकडे लक्ष वेधत केळी उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसला असून विमा कंपनीने चालू वर्षात केळी पिकविमा नामंजूर केला आहे असे खा. रवींद्र चव्हाण यांनी सरकारला लक्षात आणून दिले. सरकारने केळी पीकविमा मंजूर करत नांदेड जिल्ह्यात दर्जेदार स्वयंचलित हवामान केंद्रांची (ऑटोमॅटीक वेदर स्टेशन) उभारणी करावी अशी मागणी खा. रवींद्र चव्हाण यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. खा. रवींद्र चव्हाण यांनी लोकसभेत बोलताना शेतकऱ्यांच्या संदर्भातील विविध मागण्यांकडे केंद्र सरकारचे ध्यान आकर्षित केल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**७ ऑगस्ट कृषी विद्यार्थी दिन!**

हरितक्रांतीचे जनक डॉ. स्वामीनाथन यांची ७ ऑगस्ट रोजी जयंती आहे. कृषी क्षेत्रात डॉ. स्वामीनाथन यांचे योगदान लक्षात घेऊन ७ ऑगस्ट रोजी त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय कृषी विद्यार्थी दिन साजरा करावा, अशीही मागणी खा.रवींद्र चव्हाण यांनी केली.

# जागतिक तस्करी विरोधी दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक मानवी तस्करी विरोधी दिनानिमित्त, महिला व बाल विकास विभाग जिल्हा बाल संरक्षण कक्ष चाईल्ड लाईन व जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण प्रतिष्ठान याच्या संयुक्त विद्यमानाने नांदेड जिल्ह्यामध्ये एक अभिसरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. ज्यामध्ये बाल संरक्षण आणि बाल हक्क परिसंस्थेतील प्रमुख भागधारकांना एकत्र आणले.



बाल तस्करीशी लढण्यासाठी समन्वित, आंतर-एजन्सी कृती आवश्यक आहे हे एकत्रितपणे ओळखून आणि संवादात सहभागी झालेल्या प्रतिनिधींनी संवादात भाग घेतला. जनसेवा ग्रामीण विकास व शिक्षण प्रतिष्ठान नांदेड ही जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रनची भागीदार आहे आणि कामगार, तस्करी, विवाह आणि लैंगिक शोषणाच्या स्वरूपात शोषित होणाऱ्या मुलांचे संरक्षण, सुटका आणि न्याय सुनिश्चित करण्यासाठी नांदेड जिल्ह्यामध्ये सक्रियपणे काम करत आहे. जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन, यांनी बाल तस्करी रोखण्यासाठी कायदा अंमलबजावणी संस्थांना येणाऱ्या आव्हानांवर चर्चा करताना, कार्यक्रमात उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी विद्यमान कायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची, तस्करी नेटवर्कबद्दल समुदायांना संवेदनशील करण्याची आणि सुटका केलेल्या मुलांचे वेळेवर न्याय आणि प्रभावी पुनर्वसन सुनिश्चित करण्यासाठी सर्व एजन्सीमध्ये समन्वय मजबूत करण्याची तातडीची गरज यावर एकमताने सहमती दर्शविली. सदरील कार्यक्रमास जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांनी बालकाच्या संदर्भात काम करत असताना समन्वयाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असून बाल तस्करी रोखण्यासाठी सर्वांनी आपले महत्वाचे योगदान देण्याचे प्रतिपादन केले.

मानवी तस्करी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक ए. जी. मोरे., आरपीएफचे पोलीस निरीक्षक मीना, जीआरपीएफच्या स्वाती ठाकूर, जनसेवा प्रतिष्ठानचे जगदीश राऊत व जिल्हा समन्वयक निलेश कुलकर्णी व आशा सूर्यवंशी यांच्यासह जिल्हा बाल संरक्षण कक्षातील कल्पना राठोड, चाईल्ड लाईनच्या ऐश्वर्या व दिपाली हिंगोले यांची उपस्थिती होती.

उल्लेखनीय म्हणजे,जनसेवा प्रतिष्ठान ने जुलैमध्ये बाल तस्करीबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी रेल्वे संरक्षण दलासोबत भागीदारी केली. तस्कर अनेकदा राज्यांमध्ये मुलांची वाहतूक करण्यासाठी रेल्वेचा वापर करतात हे लक्षात घेता, या कार्यक्रमात प्रवाशांना, रेल्वे कर्मचारी, विक्रेते, दुकानदारांना आणि कुलींना बाल तस्करीची चिन्हे कशी ओळखायची आणि संशयित प्रकरणांची सुरक्षितपणे तक्रार कशी करायची याबद्दल संवेदनशील करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले.

# स्वारातीम विद्यापीठ आणि BOAT (Western Region) यांच्यात सामंजस्य करार

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त 'अखिल भारतीय शिक्षण समागम २०२५' या भव्य कार्यक्रमात काल नवी दिल्ली येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि BOAT (Board of pprenticeship Training - Western Region) यांच्यात औपचारिक सामंजस्य करार (चेण) करण्यात आला.

हा करार माननीय कुलगुरू प्रा. डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ अशोक महाजन आणि BOAT चे संचालक यांच्यात करण्यात आला. या महत्त्वाच्या प्रसंगी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे उच्च शिक्षण विभागाचे माननीय सचिव विनीत जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार हस्तांतरित करण्यात आला.

उल्लेखनीय बाब म्हणजे, हा सामंजस्य करार विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) च्या अंमलबजावणीला विशेषतः उद्योग क्षेत्रातील अप्रेंटिसशिप टप्प्यावर अधिक बळकटी देईल. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच प्रत्यक्ष उद्योग अनुभव प्राप्त करून देणे, ही या कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

हा करार विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करत विद्यापीठ-उद्योग सुसंवादास नवीन दिशा देणारा ठरेल, असा विश्वास विद्यापीठ प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्ष लागवड



**किनवट (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा आफ सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त किनवट येथील श्री गजानन महाराज मंदिर संस्थान परिसरात बुधवारी वृक्ष लागवड व संगोपन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम आर्यवैश्य समाज आणि जिल्हा आर्यवैश्य महासभेच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

सदर कार्यक्रमात समाज बांधवांनी एकत्र येत पर्यावरण रक्षणाचा संदेश देत विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण केले. कार्यक्रमाचे नेतृत्व आर्यवैश्य समाज किनवटचे अध्यक्ष दिनकरराव चाडावार यांनी केले. या उपक्रमात नांदेड जिल्हा आर्यवैश्य महासभेचे ग्रामीण उपाध्यक्ष संतोष पिंपरवार, महासभेच्या समन्वय समितीचे सदस्य डॉ.अशोक चिन्नावार, जिल्हा सदस्य गोविंद चक्करवार, तसेच किनवट नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष अजय चाडावार यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमात सुनील वट्टमवार, संजय कंचर्लावार, संतोष चक्करवार, निशांत चाडावार, विशाल पांपटवार, संतोष कंचर्लावार, सुमीत चाडावार, जयराम कंचर्लावार, गजानन कोत्तावार, प्रा. प्रकाश उत्तरवार, दीपक वट्टमवार, ललित चाडावार, गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त रमेश दारमवार, विशाल चाडावार, मंगेश नार्लावार, महेश वट्टमवार, आशिष कंचर्लावार, गजानन पेन्शनवार आदी समाजबांधवांनी सक्रिय सहभाग घेतला. पर्यावरणाचा समतोल राखणे, हरित क्षेत्र वाढवणे व भावी पिढीसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण तयार करणे हा या उपक्रमाचा हेतू असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या समाजहितासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर्य वैश्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. वृक्षांची देखभाल आणि संगोपनाची जबाबदारीही उपस्थितांनी सामुहिकपणे स्वीकारली असल्याचे सांगण्यात आले.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात १४ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात ३१ जुलैच्या सकाळी ६ वाजेपासून ते १४ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल.

त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

सोमवार ४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथून सकाळी ९ वाजता नांदेड येथे आगमन व शासकीय विश्रामगृह कडे रवाना. सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे अप्पर जिल्हाधिकारी तथा जिल्हा तक्रार निवारण अधिकारी यांचे समवेत एईपीडीएस अंतर्गत नियतन, उचल व वाटपाचा आढावा. दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे शिक्षणाधिकारी प्राथमिक व प्रशासकीय अधिकारी शा.पो.आ यांचे समवेत शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत नियतन, उचल व वाटपाचा आढावा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा बाल रोग तज्ञ व मनपा बाल रोग यांचेसमवेत कुपोषीत बालकांबाबत आढावा. तसेच एनआरसीमध्ये गत २ वर्षांत दाखल बालकांबाबतचा अहवाल. दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा कार्यक्रम अधिकारी व प्रकल्प अधिकारी शहरी व ग्रामीण यांचे समवेत महिला व बाल विकास सेवा योजनेअंतर्गत नियतन, उचल व वाटपाचा आढावा. दुपारी २.३० वाजता जिल्ह्यातील तृतीयपंथी संघटना, भीकमुक्ती संदर्भीय काम करणाऱ्या संघटना, वेश्याव्यावसायिक यांच्याशी संलग्न संघटना, आदिवासी तालुक्यांना भेटी, शा. पो. आ.अंतर्गत बचतगट आयसीडीसी अंतर्गत बचतगट, गलीच्छवस्तींना भेटी, शासकीय धान्य गोदाम, शालेय पोषण आहार पुरवठादार गोदामे, महिला व बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी तसेच केंद्रीय स्वयंपाकगृह, शाळा, अंगणवाडी, स्वच्छ धान्य दुकानांना भेटी. सायंकाळी ६ वाजता शासकीय विश्रामगृहाकडे रवाना व मुक्काम.

मंगळवार ५ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० ते ६ पर्यत आदिवासी तालुक्यांना भेटी, शासकीय धान्य गोदामे, महिला व बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी, शा.पो. आ व आयसीडीएस अंतर्गत बचतगट यांना भेटी तसेच केंद्रीय स्वयंपाकगृह शाळा, अंगणवाडी, स्वस्त धान्य दुकानांना भेटी.

बुधवार ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० ते ६ पर्यत आदिवासी तालुक्यांना भेटी, शासकीय धान्य गोदाम, शालेय पोषण आहार पुरवठादार गोदामे, महिला व बाल विकास सेवा योजना पुरवठादार गोदामांना भेटी, शा.पो.आ. व आयसीडीएस अंतर्गत बचतगट यांना भेटी तसेच केंद्रीय स्वयंपाकगृह शाळा, अंगणवाडी, स्वस्त धान्य दुकानांना भेटी. सायंकाळी ७ वा. वाहनाने नांदेड येथून मुंबईकडे प्रयाण करतील.

# माणूस जन्माने नाही तर संस्काराने श्रेष्ठ

## शिभप भगवंतराव पाटील चांभरगेकर महाराज यांचे प्रतिपादन

**लोहा (प्रतिनिधी)–** माणूस जन्माने नाही तर संस्कारांने श्रेष्ठ असतो, असे प्रतिपादन शिभप भगवंतराव पाटील चांभरगेकर महाराज यांनी लोहा येथे जेष्ठ साहित्यिक नाटककार कवी कै.शेषराव कहाळेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त जुना लोहा येथे शिवकर्तनात केले.

जेष्ठ साहित्यिक, नाटककार, कवी कै. शेषेराव कहाळेकर यांनी जीवन जगताना विविध क्षेत्रात योगदान दिले. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकिय, व्यापार विविध क्षेत्रात भरभराट केली. ते एक संस्कारित मातापित्याचे सुसंस्कारीत पुत्र होते. माणूस जन्माने नाही तर संस्काराने माणूस असल्याचे उपदेश पर अभंगातून केले.

जुना लोहा शहरात मारोती मंदिर प्रांगणात महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिव किर्तनकार श्री शिभप भगवंतराव चांभरगेकर महाराज यांचे शिवकिर्तन कै. शेषराव कहाळेकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आले होते.



यावेळी शिवकिर्तनातून उपस्थित श्रोते, भाविक भक्तांना उपदेश पर अभंगातून मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, शेषराव कहाळेकर यांचे भरपूर साहित्य, वाङ्मय निर्मिती केली असून संत वाङ्मयाचे अनूभूती ज्ञान विचार कधीच मरत नाहीत, जिव्हाळ्याचे नाते असते. प्रेमाचे हित संबंध महत्त्वाचे आहेत. प्रेमाने परमेश्वर प्राप्ती होते. आपला विचार उच्चार चांगला असावा लागतो, तेच शेषरावजींनी आयुष्यभरात केले असल्याचेही चांभरगेकर महाराज म्हणाले.

यावेळी कार्यक्रमाला शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, लोहा - कंधार तालुका प्रभारी एकनाथ मोरे, भाजपाचे जिल्हा प्रवक्ते संतोष पांडागळे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी नगरसेवक वसंत पवार, माजी नगरसेवक अशोक संगेवार, सेवा निवृत्त तालुका कृषी अधिकारी विश्वाभंर मंगनाळे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कऱ्हाळे, आझाद ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष भीमाशंकर मामा कापसे, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, भाजपाचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, जिल्हा बँकेचे संचालक शिवकुमार भोसीकर, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक भास्करराव पाटील पवार, अप्पाराव पाटील पवार, करीम शेख, भीमराव पाटील शिंदे, नारायण येलरवाड, अनिल दाढेल यांच्यासह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# ‘दूर का राही’-किशोरदांच्या गाण्यांतून आठवणींचा साज

## २ ऑगस्ट रोजी हरि-दर्शन संगीत समारोहाचे नांदेडमध्ये आयोजन

**नांदेड,(प्रतिनिधी)**

संगीतप्रेमींना स्वरमधुर भेट देणारा 'हरि-दर्शन संगीत समारोह' यंदा पाचव्या वर्षात पदार्पण करीत आहे. लीला आर्टस् फाउंडेशन आणि चौसाळकर परिवारातर्फे कै. दर्शनानंद चौसाळकर आणि कै. प्रतीक चौसाळकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी आयोजित केला जाणारा हा सांगीतिक सोहळा यंदा विशेष ठरणार आहे.

यंदाच्या कार्यक्रमात हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक किशोरकुमार यांच्या जन्मदिनी म्हणजेच २ ऑगस्ट रोजी त्यांना आदरांजली वाहत ‘दूर का राही’ या गीतांचा, आठवणींचा आणि किस्स्यांचा विशेष कार्यक्रम सायंकाळी ७ वाजता नांदेड येथील कुसुम सभागृहात रंगणार आहे.

या कार्यक्रमात किशोरदांनी गायलेल्या गाजलेल्या गीतांची सुरेल मैफल रसिकांच्या भेटीला येणार असून, त्यासोबतच त्यांच्या आयुष्यातील खुसखुशीत, हसरे, संवेदनशील आणि प्रेरणादायी प्रसंगांची रंजक मांडणीही केली जाणार आहे.

सदर कार्यक्रम वाद्यवृंदासहित सादर होणार असून निवेदनाची बाजू आकाशवाणी मुंबईचे नामवंत निवेदक राजेंद्र पाटणकर सांभाळणार आहेत. तर स्वरगंधाचा साज चढवण्यासाठी महाराष्ट्र आणि कर्नाटकातून येणारे नामवंत गायक सहभागी होत आहेत.

संगीता भावसार (संभाजीनगर), हर्षा देसाई (बंगलोर), तसेच नांदेडचेच सुपुत्र उमेश देशमुख आणि प्रणव देशमुख हे कलाकार किशोरदांच्या अजरामर गीतांना आपल्या सुस्वरात सादर करणार आहेत.

संगीतप्रेमींसाठी आणि किशोरदांच्या चाहत्यांसाठी ही एक अविस्मरणीय संधि ठरणार असून, हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे.या कार्यक्रमाला नांदेड शहरातील रसिकांनी, सांस्कृतिक प्रेमी नागरिकांनी, युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संगीताच्या या अनोख्या प्रवासाचा आनंद घ्यावा असे आवाहन तन्मय ग्रुपचे अध्यक्ष डॉ. नाथा चितळे यांनी केले आहे




## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधिताना प्रस्तुत जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव, सारीपुत तुळसीराम जाधव, संघरत्न तुळसीराम जाधव रा. जेतवन नगर नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून पुढीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येते कि,श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव यांना दोन मुल नामे सारीपुत तुळसीराम जाधव, संघरत्न तुळसीराम जाधव व एक मुलगी सौ. वैशाली रावसाहेब चौदन्ते अशी अपत्य असून जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड मधील स.न. ७१ गट न. २३४ मधील एकून क्षेत्रफळ १२०० चौ. फु. चा प्लॉट क्र. ३१ हा त्यांचा स्वकष्टार्जित प्लॉट असून सदर प्लॉट त्यांना त्यांच्या दोन्ही मुलांच्या नावे हस्तांतरित करावयाचा आहे. त्याकरिता श्री. तुळसीराम पि. जळबाजी जाधव यांनी दोन्ही मुलांमध्ये नोंदणीकृत वाटणीपत्र तयार केले असून सदर वाटणी पत्रास त्यांची मुलगी नामे सौ. वैशाली रावसाहेब चौदन्ते यांनी संमतीपत्रा आधारे आपली संमती दिली आहे. भविष्यात दोन्ही भावात वादविवाद होऊ नये या करिता दोघात सदर वाटणी आधारे प्लॉट क्र. ३१ ची समान हिश्यात विभागणी करून सदरील प्लॉट क्र ३१ चा दक्षिणेकडील १५ ु ४० म्हणजे ६०० चौ. फ ु. भाग सारीपुत तुळसीराम जाधव यांना व प्लॉट क्र. ३१चा उत्तरेकडील १५ु४० म्हणजे ६०० चौ. फु. चा भाग संघरत्न तुळसीराम जाधव यांच्या नावे हस्तांतरित करण्याचे निचित करण्यात आले आहे.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास सूचित करण्यात येते कि,श्री.सारीपुत तुळसीराम जाधव व श्री. संघरत्न तुळसीराम जाधव या दोन्ही भावामध्ये स.न. ७१ गट न. २३४ मधील एकून क्षेत्रफळ १२०० चौ. फु. चा प्लॉट क्र. ३१ चे दोन समान हिश्यात म्हणजे प्रत्येकी ६०० चौ. फु मध्ये विभागणी करून त्यांचे नावे जेतवननगर मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. तरोडा (बु) नांदेड मार्फत हस्तांतरित करण्याचे निचित करण्यात आले आहे. त्याबाबत कोणास आक्षेप अथवा उजर असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह जाहीर प्रगटन देणार यांचेकडे खालील पत्त्यावर सादर करावा, मुदतीनंतर आलेला आक्षेप अथवा उजर ग्राह्य धरल्या जाणार नाही व दोन्ही भावामध्ये सदर प्लॉट चे समान हिश्यात हस्तांतरण करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत**
**ॲड. पवार विलास एम.**
**जिल्हा व सत्र न्यायालय नांदेड.**

**जाहीर प्रगटन देणार**
**श्री.तुळसीराम जळबाजी जाधव**
**श्री.सारीपुत तुळसीराम जाधव,**
**श्री.संघरत्न तुळसीराम जाधव**
**सर्व रा. जेतवन नगर तरोडा बु. नांदेड**

## अपर मुख्य सचिव खारगे यांनी स्वीकारला महसुल विभागाचा पदभार

**मुंबई,(प्रतिनिधी)** -मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव हा पदभार स्वीकारला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री.खारगे यांच्याकडे यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अपर मुख्य सचिव पदाचा कार्यभार होता. तत्पूर्वी त्यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांत महत्त्वपूर्ण पदांवर काम केले आहे. महसूल विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर महसूल मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी विभागाच्या कामाचा तसेच पुढील कामाच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेतला.

## टी. सी. व महत्वाचे कागदपत्र हरवले आहेत.

माझी गायकवाड चंद्रकांत धोंडिबा या नावाची इयत्ता १० वी पास मार्क मेमो व सनद, इयत्ता १२ वी पास मार्कमेमो, सनद डी.एड.टी.सि.व मार्कमेमो,बी.ए. मुक्तविद्यापीठाचे मार्कमेमो , आणि जातीचे प्रमाणपत्र, रहिवाशी व वयाचा दाखला,पॅनकार्ड असे महत्वाचे शैक्षनिक कागदपत्र दि. २७ जुलै २०२५ रोजी मुखेड ते नांदेड एस.टी.ने प्रवास करतेवेळी पुर्ण कागदपत्राची फाईल हरवली आहेत.कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता.**
**गायकवाड चंद्रकांत धोंडिबा**
**रा.सांगवी बे.ता.मुखेड जि.नांदेड**
**मो.नं.९३२५८५४५११ ,९३२५६३९४८१**

## टी.सी.हरवली

माझी नामे राहुल माधवराव वाघ या नावाची इयत्ता दहावी पासची टि. सी.नांदेड ते जैतापूर बसने प्रवास करताना हरवली आहे. तरी कृपया कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**
**राहुल माधवराव वाघ,**
**मु.नाळेश्वर पो.ढोकी, ता.जि.नांदेड मो.नंबर ९८९०५७७३७४**

## Change In Name

My Old Name is QUAZI MOHIBUDDIN ANGER which now I am changing as New Name QUAZI ANGER MOHIBODDIN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: NEAR JAMA MASJID SIPAI MOHALLA HIMAYATNAGAR NANDED 431802 MO.9423440271

## टी.सी.हरवली

माझी प्रसाद रामदास वाघमारे या नावाची १२ वी पासची टि.सी. तरोडा नाका ते बसस्थानक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा -

**संपर्क पत्ता**
**प्रसाद रामदास वाघमारे**
**रा.दिग्रस ता.अर्धापुर**
**जि.नांदेड मो.९८९०५७०२७०**

## टी.सी.हरवली

माझी आनंदा पंडीत तिडके या नावाची ११ वी पासची टि. सी. तरोडा नाका ते बसस्थानक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा -

**संपर्क पत्ता**
**आनंदा पंडीत तिडके**
**रा.दिग्रस ता.अर्धापुर जि.नांदेड**
**मो.९८९०५७०२७०**

## जाहीर प्रगटन

मौजे गोपाळचावडी ता.जि. नांदेड हद्दीतील शेत गट नंबर ३३ पैकी ३ प्लॉट नंबर ३३,३४,४३ असून तिन्ही प्लॉटचे एकूण ३००० चौरस फुटाचे तिन प्लॉट शामसुंदर हणंमतराव नायगावे रा.जिदंमनगर गोपाळचावडी नांदेड यांचेकडून अब्दुल गफफार खाजामिया रा.खुदबेनगर इतवारा नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटनंबर ३४ ची** चुर्तसिमा पुर्वेस-प्लॉट नंबर ४२, पश्चिमेस- २०फुट रूंद रोड, दक्षिणेस-प्लॉट नं.३३ व ४३,उत्तरेस - २५ फुट रूंद रोड,**प्लॉटनंबर ३३ ची चुर्तसिमा** पुर्वेस-प्लॉट नंबर ४३, पश्चिमेस- २०फुट रूंद रोड, दक्षिणेस-२५ फुट रूंद रोड,उत्तरेस - प्लॉट नं.३४ **प्लॉटनंबर ४३ ची चुर्तसिमा** पुर्वेस-प्लॉट नंबर ४२, पश्चिमेस- प्लॉट नंबर ३३, दक्षिणेस-२५ फुट रूंद रोड,उत्तरेस - प्लॉट नं..३४ व ४१

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉट खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**अब्दुल गफफार खाजामिया रा.खुदबेनगर इतवारा नांदेड**

## Change In Name

My Old Name is NASEEM BANU MOHAMMED SULATAN which now I am changing as New Name NASIMA BANU PATHAN ARIF KHAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: H.N.9-7-1175 MOHSINCOLONY DEGLOOR NAKA NEAR AKABR FUNCTION HALL ITWARA NANDED 431604 MO.9860074440

## Change In Name

My Old Name is YASMEEN ANJUM which now I am changing as New Name YASMEEN ANJUM QUAZI MOHIBODDIN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Address: NEAR JAMA MASJID SIPAI MOHALLA HIMAYATNAGAR NANDED 431802 MO.9423440271

## टी.सी.हरवली

माझी शिवा संजय ईश्वरे या नावाची १० पासची टि.सी. तरोडा नाका ते बसस्थानक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा -

**संपर्क पत्ता**
**ईश्वरे प्रकाश मल्हारी**
**रा.रविनगर जंगमवाडी नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी अरबाजखान रहीमखान पठाण या नावाची इयत्ता १२ वी पासची टीसी.मुखेड ते नांदेड प्रवास करत असताना हरवली आहे.तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**:संपर्क पत्ता:**
**अरबाजखान रहीमखान पठाण**
**मु.पो.मुखेड जि.नांदेड**
**मो.नं.९०४९७ २०५९४**

## Change In Name

My Old Name is MOHD.KHAYUM MOHD SIDDIK FARUQUI S/O MOHD SIDDIK FARUQUI which now I am changing as New Name MOHAMMAD KHAYUM MOHAMMAD SIDDIK FARUQUI Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same.Add-:MOHAMMAD KHAYUM MOHAMMAD SIDDIK FARUQUI H.N.2-51064/1 SAMIRA BAGH WAGHI ROAD VAZIRABAD NANDED 431601 MO.9922500311

## टी.सी.हरवली

माझी नम्रता खंडेराव ईश्वरे या नावाची १० पासची टि. सी. तरोडा नाका ते बसस्थानक ऑटोने प्रवासा दरम्यान हरवली आहेत कुणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा -

**संपर्क पत्ता -**
**ईश्वरे प्रकाश मल्हारी**
**रा.रविनगर जंगमवाडी नांदेड**







१००९/२५-२६

### गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड

## जाहीर निविदा

सर्व साऊंड सिस्टम संबंधित व्यापा-यांना सुचित करण्यात येते की गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड च्या मालकीचे एस.जी.पी.सी गेस्ट हाऊस फस्ट फलोर मिटींग हॉल साऊंड सिस्टम व्यवस्थेकरिता डिपार्टमेंटली कार्यासाठी निम्नलिखीत सामग्रीचे लोडींग-अनलोडींग रॉयल्टी आदि सर्व गृहित धरुन बंद लिफाफयात प्रति नग प्रमाणे दर कोटेड करुन अधिक्षक गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुर अबचलनगर साहीब नांदेड (महाराष्ट्र) च्या नावाने दिं. ०५-०८-२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत पोहचतील या बेताने किवा समक्ष आणुन दयावे.

| | |
|---|---|
| 1 .AM6.1 Speekar Box | 06 Nos. |
| 2.DIGI More Amplifire | 01 Nos. |
| 3.VX Pro Dice Mic | 15 Nos. |
| 4.Behringer Proceser | 01 Nos. |
| 5.Studio Master Mixer | 01 Nos. |
| 6. Box Wiring Bundle | 02 Nos. |
| 7.Mice Cables | 01 Nos |
| 8.Installation Charges | 15 Nos. |

नोट-१कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार अधिक्षक तख्त सचखंड गुरुद्वारा अबचलनगर साहीब नांदेड कडे राखीव आहेत.

२.अधिक माहीती साठी इंजीनिअरींग विभागाशी संपर्क साधवा.

**अधिक्षक**
**गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड.**






# गोदातीर समाचार









**नांदेड–** सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी आज भारतीय जनता पार्टी महानगर कार्यालय, औद्योगिक वसाहत प्लाझा, नाना-नानी पार्क समोर येथ भेट दिली. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांचे स्वागत करताना विजय येवनकर, चैतन्यबापू देशमुख, बी. आर. कदम, प्रवीण साले, शीलत खांडील, सचिन पाटील उमरेकर, विजय गंभीरे दिसत आहेत.

## ग्रामीण पोलीस स्टेशनच्यावतीने सिडकोत पोलिसांचे पथसंचलन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** ग्रामीण पोलीस स्टेशनच्यावतीने सिडको परिसरातील मुख्य मार्गावर पोलीस निरीक्षक रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथसंचलन करण्यात आले.

आगामी सण, उत्सव, जयंतीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी गुरुवार, दि. ३१ जुलै रोजी सिडको परिसरात मुख्य मार्गावर जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालासाहेब रोकडे, सहाय्यक विजय कांबळे, सचिन गढवे, कुसमे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, बाबुराव चव्हाण यांच्यासह पोलीस अंमलदार, महिला पोलीस, होमगार्ड यांनी रमाबाई आंबेडकर चौक ते अण्णा भाऊ साठे मार्ग ज्ञानेश्वर नगर, डॉ. ढगे मार्ग उस्मानगर रोडवर हे पथसंचलन केले.

## आजपासून जागतिक स्तनपान सप्ताहास सुरुवात

**नांदेड–**दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान जागतिक स्तनपान सप्ताह साजरा केला जातो. यावर्षीचा जागतिक स्तनपान सप्ताह स्तनपान: एक आरोग्यदायी भविष्य घडवण्यासाठी या संकल्पनेवर आधारित आहे. स्तनपानाचे महत्त्व अधोरेखित करणे आणि मातांना स्तनपानासाठी प्रोत्साहित करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

सुपोषित नांदेड बनवण्यासाठी आयआयटी बॉम्बे यांनी जे परिश्रम घेतले, तसेच प्रशिक्षण देऊन प्रशिक्षक बनवले. त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात त्याचा उपयोग करून सुपोषित नांदेड ध्येय, उद्देश साध्य करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिले.

## अवैध वाळूसह ४ कोटी ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त, पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील येळी आणि कौडगाव वाळू घाटावर उस्माननगर पोलिसांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून कारवाई केली. यावेळी दोन्ही वाळू घाटावरून ४ कोटी ७२ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी ५ जणांविरुद्ध उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश ऑऊट अंतर्गत, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी यांना अवैध रेतीची चोरटी वाहतूक व विक्री करणारे चालक व मालकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने ३१ जुलै रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप व उस्माननगर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेव-ार आणि फौजदार गजानन गाडेकर यांच्यासह आदी अंमलदार यांनी येळी व कौडगाव गोदावरी नदी पात्रात छापा कारवाई केली. तेथे संभाजी प्रभाकर सोमवारे रा. येळी, व्यंकटी आनंदराव ढगे रा. मारतळा, संदीप रामराव ढेपे रा. मारतळा, ओमप्रकाश एकनाथ जाधव रा. चिंचोली आणि गजानन सुदाम हवणे राहणार कौडगाव हे अवैधरित्या वाळू उपसा करीत असताना दिसून आले.

## आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुद्वारात श्री अखंडपाठ

**नांदेड (प्रतिनिधी) –** लोहा-कंधार विधानसभेचे विद्यमान आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा २ ऑगस्ट रोजी वाढदिवस. त्यानिमित्त येथील धार्मिक-स्थळ गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजुरसाहेबमध्ये श्री अखंड पाठाचा प्रारंभ करण्यात आला आहे. गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे माजी सदस्य जगबीरसिंघ शाहू यांच्यातर्फे या पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ३१ जुलै रोजी ठेवण्यात आलेल्या पाठाचा समारोह शनिवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी करण्यात येणार आहे.

गुरुवार, दि. ३१ जुलै रोजी श्री अखंडपाठाचा आरंभ होताना जगबीरसिंघ शाहू, हरभजनसिंघ दरोगा आणि शाहू कुटुंबीय उपस्थित होते. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना उत्तम स्वास्थ्य लाभावे व त्यांची दैनंदिन प्रगती व्हावी, अशी प्रार्थना या वेळी करण्यात आली.

शुक्रवार, दि. १ ऑगस्ट रोजी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर स्वतः गुरुद्वाराचे दर्शन घेऊन प्रार्थना करणार आहेत, अशी माहिती जगबीरसिंघ शाहू यांनी दिली.




## छत्रपती संभाजीनगर-परभणी लोहमार्ग दुहेरीकरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**नांदेड(प्रतिनिधी)–** केंद्रीय मंत्रिमंडळाने छत्रपती संभाजीनगर - परभणी (१७७ कि.मी.) लोहमार्ग दुहेरीकरणाला आजच्या (दि.३१/०७/२०२५) केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली.

छत्रपती संभाजीनगर-परभणी लोहमार्ग दुहेरीकरण मराठवाड्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. संपूर्ण मराठवाड्याला मुंबई, पुणे, नाशिक तसेच उत्तरेत जाण्यासाठी हा मार्ग महत्वाचा आहे. या लोहमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी मिळाल्याने मराठवाड्यातील रेल्वे प्रवास आगामी काळात वेगवान होणार आहे. आज जरी या लोहमार्गाच्या दुहेरीकरणाला मंजुरी मिळाली असली तरी त्याची पायाभरणी मात्र नि:शंकपणे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केली.


मराठवाड्यातील परभणी-मनमाड (२९१ कि.मी.) लोहमार्ग दुहेरीकरणाची कित्येक वर्षांपासून मागणी होती. रावसाहेब दानवे रेल्वे राज्यमंत्री असताना त्यांनी परभणी-मनमाड ह्या मार्गाची फोड करून अंकाई (मनमाड)-छत्रपती संभाजीनगर (९८ कि.मी.) साधारणपणे एक हजार कोटी रुपयांच्या आतील काम अंब्रेला योजनेतून मंजूर करून घेऊन भरभरून निधी देऊन प्रत्यक्ष सुरू करून घेतले. आता त्याचाच पुढचा टप्पा छत्रपती संभाजीनगर-परभणी लोहमार्ग दुहेरीकरणाला मंजुरी मिळण्यात झाला. खा. डॉ. अजित गोपछडे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि रवनीतसिंह बिट्टू यांच्यासोबत सातत्याने पाठपुरावा केला त्याची परिणती मंजुरी मिळण्यात झाली.
















**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com